MTES's

स्थापना: १९९०

Muktainagar Taluka Education Society's

मुक्ताईनगर तालुका एज्युकेशन सोसायटी, संचलित

Smt. Godavaribai Ganpatrao Khadse College, श्रीमती गोदावरीबाई गणपतराव खडसे महाविद्यालय,

Muktainagar, Dist : Jalgaon- 425306 मुक्ताईनगर, जि. जळगांव- ४२५३०६

*Visit @ www.khadsecollege.in* *Email : khadse_college1990@rediffmail.com*

Outward No: Date:

# Report of Activity

| | |
|---|---|
| Name of Activity | Awareness Workshop on NEP-2020 for Faculty |
| Date | 21October 2023 |
| Organizing Department/Venue | Internal Quality Assurance Cell&*PradhyapakPrabodhini* |
| Resource Person | Dr.UdayJagtap(Member, Academic Council, KBCNMU, Jalgaon)<br>Dr. Harish Talele(Head, Dept. of Chemistry, D.N. College, Faizpur) |
| Number of Participants | 40 |

**Aim:**To orient faculty members about National Education Policy-2020

**Outcome:**Faculty members got an idea about the structure and implementation of National Education Policy-2020

## Description

Internal Quality Assurance Cell organized a Workshop to orientatethe faculty membersaboutNational Education Policy-2020 on 21October 2023. Dr. UdayJagtap(Member, Academic Council, KBCNMU, Jalgaon), focused onthe structure the NEP-2020. Dr. Harish Talele, in the second Session gave insights on the NEP-2020.Principal Prof. H. A.Mahajanwas in the chair.






**नवीन शैक्षणिक धोरण आव्हान नव्हे, जागतिक संधी : जगताप**

मुक्ताईनगरातील व्याख्यानात नवीन धोरणावर मंथन

प्रतिनिधी | मुक्ताईनगर

परिवर्तन हा प्रकृतीचा नियम आहे. त्यामुळे मनुष्याने प्रत्येक परिवर्तनासाठी सदैव तयार राहावे. या नियमानेच जुन्या शिक्षण प्रणालीला सोडून नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करावी लागेल, असे डी.एन.कॉलेजचे उपप्राचार्य डॉ.उदय जगताप यांनी सांगितले.

येथील जी.जी.खडसे महाविद्यालयात प्राध्यापक प्रबोधिनी व आयक्यूएसी विभागाद्वारे 'नवीन शैक्षणिक धोरण २०२०' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एच.ए.महाजन, तर फैजपूर येथील डी.एन.कॉलेजचे पदार्थ विज्ञान विभागाचे प्रा.डॉ.उदय जगताप मुख्य मार्गदर्शक होते. त्यांनी नवीन शैक्षणिक धोरणाचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, शिक्षणाचा स्तर नेहमीच बदलत जातो. कारण, परिवर्तन हा प्रकृतीचा नियम असतो. त्यामुळे मनुष्याने प्रत्येक परिवर्तनासाठी सदैव तत्पर रहायला हवे. जर औद्योगिकीकरणाच्या जगामध्ये भारताला आपले अस्तित्व टिकवून ठेवायचे असेल तर जुन्या शिक्षण प्रणालीला सोडून नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करावी लागेल. शिक्षणाचे नवीन निकष आपण स्वतः तयार करायला हवे. तरच आपल्याला जागतिकीकरणाच्या युगामध्ये टिकून राहता येईल. कोणतेही शैक्षणिक धोरण हे आव्हान नसून सर्वांसाठी संधी आहे. या संधीचे सर्वांनी सोने करायला हवे. नवनवीन विषयांचे अवलोकन करून नवीन शिक्षण प्रणाली सर्वांसाठी उपयुक्त कशी राहील, यावर भर द्यायला हवा. नवीन शैक्षणिक धोरण २०२० राबवताना असलेली आव्हाने स्वीकारून पुढे जावे लागेल, असे सांगितले.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. हेमंत महाजन यांनी नवीन शिक्षण धोरणाची दशा व दिशा महाविद्यालयासाठी कशी योग्य राहील ही माहिती दिली. तसेच प्राध्यापकांना नवीन शिक्षण धोरणासाठी तयारी व दिशानिर्देश कसे असावे, ते विद्यार्थ्यांना कसे पटवून सांगावे याविषयी मार्गदर्शन केले. उपप्राचार्य डॉ.ए.पी.पाटील, डॉ.आर.टी.चौधरी उपस्थित होते. सूत्रसंचालन कृष्णा गायकवाड यांनी केले.

IQAC Coordinator

Coordinator
Internal Quality Assurance Cell,
Muktainagar Taluka Education Society's
Smt.Godavaribai Ganpatrao Khadse College, Muktainagar,Dist.Jalgaon

Smt. G.G.Khadse College ★ M.T.E.S. ★ Muktainagar, Dist.Jalgaon

Principal

PRINCIPAL
Muktainagar Taluka Education Society's
Smt.Godavaribai Ganpatrao Khadse College,
Muktainagar,Tq. Muktainagar, Dist. Jalgaon